**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक ११ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **राजकोषीय तूट तीन टक्क्यांपेक्षा कमी आणि महसूली तूट एक टक्क्यापेक्षा कमी राखण्यात राज्याला यश आल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन.**
2. **घरगुती गॅसच्या टंचाईबाबत राज्य सरकारनं योग्य उपाययोजना कराव्यात असे विधानसभा अध्यक्षांचे निर्देश.**
3. **एलपीजी गॅसच्या तुटवड्यावरून विरोधकांचा लोकसभेत गदारोळ.**
4. **विदर्भात उष्णतेचा पारा वाढला; अकोल्यात सर्वाधिक 40 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद.**

---------------------------------------

मुख्यमंत्री

राजकोषीय तूट तीन टक्क्यांपेक्षा कमी आणि महसूली तूट एक टक्क्यापेक्षा कमी राखण्यात यश आलं आहे. ज्या तुलनेनं कर्ज वाढलंय, त्याच्या कितीतरी पट अधिक भांडवली गुंतवणूक वाढली आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. ते आज विधानसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देत होते. राज्यासमोर अनेक अडचणी आहेत; मात्र अडचणीतून मार्ग काढण्याची क्षमता महाराष्ट्रात असून आर्थिक शिस्तीचं पालन करत यंदाचा अर्थसंकल्प मांडला आहे, असं ते म्हणाले. राज्यावरील कर्ज वाढलं हे खरं आहे; मात्र सकल देशांतर्गत उत्पन्नाच्या २५ टक्क्यांच्या आत कर्ज असणं आवश्यक असतं आणि महाराष्ट्रावरचं कर्ज १८ टक्के आहे, असं सांगत कर्ज घेण्याची महाराष्ट्राची क्षमता अजून आहे, असं त्यांनी सांगितलं. राज्य दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत देशात पाचव्या क्रमांकावर आहे; मात्र राज्याच्या जीडीपी वाढीचा दर देशाच्या जीडीपी वाढीच्या दरापेक्षा जास्त आहे, असंही फडणवीस यांनी नमूद केलं. महाराष्ट्राचा जीडीपीतला वाटा १४ पूर्णांक ३ दशांश टक्के असून केंद्राकडून ८७ हजार ९०३ कोटी रु. परतावा मिळतो, असं त्यांनी सांगितलं.

---------------------------------------

विधिमंडळ/गॅस तुटवडा

अमेरिका - इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात गॅस टंचाई जाणवत आहे. यासंदर्भात राज्यात गॅसचा किती साठा आहे आणि गॅस पुरवठा सुरळीत करण्यासाठी सरकार कोणत्या उपाययोजना राबवत आहे, याची माहिती द्यावी, अशी मागणी काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केली. तुटवड्यामुळे मुंबई आणि नागपूर या शहरांमध्ये ३० टक्के हॉटेल्स बंद झाली आहेत, असं वडेट्टीवार यांनी सांगितलं. यावर हा प्रश्न केंद्र सरकारशी संबंधित असला, तरी राज्य सरकारनं योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशा सूचना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिल्या.

**ऐकूया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधीकडून-**

***(व्हॉइस कास्ट - नम्रता फलके)***

***राज्यात सध्या खताचा तुटवडा नाही, ३९ लाख ७९ हजार मेट्रिक टन खताचा साठा उपलब्ध आहे अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. जयंत पाटील यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. खताची अधिक दराने विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्रांवर सहा महिन्यांच्या निलंबनाची कारवाई केली जाईल असं भरणे यांनी नाना पटोले, सुरेश धस यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. माजी सैनिकांना देण्यात येणाऱ्या जमिनीचं वर्ग एक मध्ये रुपांतरण करण्याचा निर्णय या महिनाअखेरीस घेतला जाईल असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. तसंच माजी सैनिक आणि भूमिहीनांना कमीत कमी अधिमूल्य आकारलं जाईल असं ते म्हणाले. श्वेता महाले यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. एसटी महामंडळात चालक आणि वाहक या पदांसाठी १७ हजार ६४२ कर्मचाऱ्यांच्या भर्तीचा प्रस्ताव विभागानं राज्य शासनाकडे पाठवला आहे. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर ताबडतोब ही मेगाभर्ती होईल, अशी ग्वाही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला दिली. आखाती देशांत सुरू असलेल्या युद्धामुळे गॅस आणि इंधनांचा तुटवडा निर्माण होऊन जनजीवनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. वसतीगृहांमध्ये राहणाऱ्या मुलांच्या परीक्षा सुरू असल्यानं त्यांची गैरसोय होऊ नये, त्यामुळे त्यांना कोणताही त्रास होणार नाही, याची जिल्हाधिकाऱ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी आणि योग्य ती व्यवस्था करावी, असे निर्देश विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी दिले. प्रसाद लाड, प्रवीण दरेकर आणि सचिन अहिर यांनी या मुद्द्यावर प्रश्न उपस्थित केला होता.***

***(आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी नम्रता फलके)***

---

लोकसभा

एलपीजी गॅसच्या तुटवड्यावरून विरोधकांनी आज लोकसभेत गदारोळ केल्यामुळे कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित झालं. सकाळी कामकाजाला सुरुवात होताच विरोधी पक्ष सदस्यांनी पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनाजवळ जमून घोषणाबाजी करायला सुरुवात केली. विरोधकांच्या घोषणाबाजीतच पीठासीन अधिकारी दिलीप सैकिया यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. मात्र, तरीही विरोधकांचा गदारोळ सुरू राहिला. वारंवार विनंती करूनही गदारोळ सुरूच राहिल्यानं सैकिया यांनी कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब केलं. लोकसभेच्या सभापतींनी विरोधी पक्षनेत्याला बोलायची संधीच न देणं, विरोधकांना मुद्दे मांडण्यासाठी वेळ न देणं हे भारतीय लोकशाहीच्या इतिहासात प्रथमच घडत असल्याची टीका राहुल गांधी यांनी केली. ओम बिर्ला यांच्यावरच्या अविश्वास प्रस्तावावरच्या चर्चेवेळी ते बोलत होते. दरम्यान विरोधी पक्षांच्या काही नेत्यांच्या अहंकारापोटी हा ठराव आणल्याचं भाजपचे रविशंकर प्रसाद म्हणाले.

---------------------------------------

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

महिला या फक्त शेती करत नाहीत, तर शेतीचं भविष्य घडवत आहेत. महिला शेतकरी समृद्ध झाल्या, तरच राज्य समृद्ध होईल, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज केलं. आंतरराष्ट्रीय महिला दिन आणि संयुक्त राष्ट्र संघटनेनं जाहीर केलेल्या आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष २०२६ च्या निमित्तानं विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात त्या बोलत होत्या. महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी सरकार पुढच्या अधिवेशनात विशेष विधेयक आणेल, असं आश्वासन त्यांनी दिलं.

---------------------------------------

आत्मसमर्पण

छत्तीसगडच्या सहा जिल्ह्यांमधल्या १०८ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं आहे. त्यांच्यावर सुमारे ३ कोटी ९५ लाख रुपयांचं एकत्रित बक्षीस होतं. केंद्रीय गृह मंत्रालयानं आज ही माहिती दिली. देश येत्या महिनाअखेरीपर्यंत नक्षलवादापासून मुक्त होईल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला आहे.

---------------------------------------

राष्ट्रीय लोक अदालत

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशानुसार येत्या १४ मार्च रोजी नागपूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचं आयोजन करण्यात आलं आहे. जिल्हा आणि सत्र न्यायाधीश तथा

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष दिनेश सुराणा यांच्या मार्गदर्शनाखाली ही अदालत होणार आहे. दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात भरपाई, वैवाहिक वाद, बँक वसुली आदी तडजोडीच्या प्रकरणांचा आपसी समेटानं निपटारा केला जाणार आहे. लोक अदालतीमध्ये प्रकरण ठेवण्यासाठी कोणतीही फी नसून निवाड्याविरुद्ध अपील करता येत नाही. पक्षकारांनी प्रलंबित तसंच दखलपूर्व प्रकरणं तडजोडीसाठी ठेवावीत, असं आवाहन करण्यात आलं आहे.

---------------------------------------

हातमाग स्पर्धा

हातमाग विणकरांनी विणलेल्या उत्कृष्ट हातमाग कापड नमून्यांना प्रोत्साहन देण्यासाठी २४ मार्च रोजी नागपूर इथं विभागीय हातमाग कापड स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. अमरावती आणि  नागपूर विभागांतर्गत असलेल्या जिल्ह्यांतील हातमाग विणकरांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येनं सहभाग घ्यावा, असं आवाहन प्रादेशिक उपआयुक्त  अंजू बालपांडे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केलं आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी हातमाग विणकरांनी तयार केलेले कापड नमूने दिनांक २० मार्च रोजी सायं. ५ वाजेपर्यंत नागपूरच्या प्रादेशिक उपआयुक्त (वस्त्रोद्योग) कार्यालयात जमा करणं आवश्यक आहे.

---------------------------------------

अभाविप आंदोलन

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, प्रशासनिक आणि  मूलभूत सुविधा संबंधित विविध प्रलंबित मागण्यांकडे विद्यापीठ प्रशासनाचं लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीनं आंदोलन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्या तातडीनं सोडवाव्यात आणि  शिक्षण व्यवस्थेमध्ये पारदर्शकता तसंच  गुणवत्ता वाढवावी, या प्रमुख उद्देशानं अभाविपनं विविध मागण्या प्रशासनासमोर मांडल्या आहेत.

---------------------------------------

दिव्यांग अनुदान

राज्यातील दिव्यांग बांधवांसाठी त्यांच्या मासिक अनुदानात हजार  रुपयांची वाढ करण्यात आली आहे. आता लाभार्थ्यांना दरमहा 2 हजार 500 रुपये अनुदान थेट बँक खात्यात मिळणार आहे. मात्र, या वाढीव लाभाचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी आपले ऑनलाईन युडीआयडी कार्ड आणि आधार कार्ड अद्ययावत करणं अनिवार्य आहे.

----------------------------------------

सरस

‘राज्यस्तरीय महालक्ष्मी सरस प्रदर्शना’चा उद्‌घाटन सोहळा आज नागपुरातील रेशीमबाग मैदानावर संपन्न झाला. या कार्यक्रमाला संस्कार भारतीच्या प्रमुख कांचन गडकरी, महापौर नीता ठाकरे, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांची प्रमुख उपस्थिती होती. 23 मार्चपर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनात महिलांनी हस्तकलेपासून उत्पादित केलेल्या विविध वस्तूंची विक्री होणार असून महाराष्ट्रातील खाद्य संस्कृतीचा आस्वाद नागपूरकरांना घेता येणार आहे. प्रदर्शनात एकूण 370 स्टॉल्स उभारण्यात आले आहेत.

----------------------------------------

मुख्यमंत्री समृद्‌ध पंचायतराज अभियान

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या वतीनं राबविण्यात येत असलेल्या ‘मुख्यमंत्री समृद्‌ध पंचायतराज अभियान’ कामाचं लोकार्पण अभिनेते भारत गणेशपुरे यांच्या हस्ते आज चंद्रपूर जिल्ह्यातल्या भद्रावती तालुक्यातील सागरा इथं करण्यात आलं. हे अभियान केवळ बक्षिसापुरतं मर्यादित न राहता, गावागावात एकोपा वाढून लोकसहभागातून काम करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी बोलताना ग्रामस्थांना केलं.

----------------------------------------

आरोग्यसंपन्न गाव

ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, प्रतिबंधात्मक आणि सर्वसमावेशक करण्याच्या उद्देशानं राज्य सरकारकडून 'माझं गाव आरोग्यसंपन्न गाव' हे महत्त्वाकांक्षी अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानात सहभागी होणाऱ्या ग्रामपंचायतींचे 59 विविध निकषावर गुणांक केले जाणार असून 70% पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या गावांना आरोग्यसंपन्न ग्राम म्हणून घोषित करण्यात येणार असल्याची माहिती अकोला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांनी दिली.

----------------------------------------

हवामान

विदर्भात उष्णतेचा पारा वाढतच आहे. मागील 24 तासांत अकोल्यात सर्वाधिक 40 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. त्या पाठोपाठ अमरावती इथं 39 पूर्णांक 8, वर्धा इथं 39 पूर्णांक 5, तर

वाशिम इथं 39 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली. आज नागपुरात कमाल तापमान 37 पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. या आठवड्यात दिनांक 13 मार्च रोजी यवतमाळ आणि चंद्रपूर इथं तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. 14 मार्च रोजी वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर इथं विरळ पर्जन्यमानाची आणि 15 तारखेला संपूर्ण विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

---------------------------------------